# भारतीय लोकशाहितील स्थित्यंतरणे व आव्हाने

**श्री. अजय बाबुराव घरजाळे** संशोधक विद्यार्थी स्वा.रा.ती.म.विद्यापीठ,नांदेड

संपर्क -८४१२८०८१०० ई-मेल -gharjale.ajay@gmail.com

---

## प्रस्तावना

'लोकांनी लोकांसाठी चालवलेली शासन पद्धती म्हणजे लोकशाही,' ही अगदीच रुळलेली व रुजलेली व्याख्याच आपल्या अंगवळणी पडली आहे.मात्र एवढी संकुचित व्याख्या भारतीय लोकशाहीची नक्कीच नाही. कारण, लोकशाही म्हणजे स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही वैश्विक मूल्ये आपणास प्रदान करणारी ती एक जीवनपद्धती आहे. हीच व्यापक संकल्पना आपल्या प्रत्येकात रुजायला हवी. आज जगाबरोबरच भारतावर 'कोरोना' सारख्या जीवघेण्या विषाणूचा हल्ला सुरू असताना प्रत्येक सामान्य नागरिकांसाठी आपली प्रशासकीय यंत्रणा दवाखान्यात, रस्त्यावर, सीमेवर, शासकीय कार्यालयात देवदूताप्रमाणेच कार्य करून देशसेवा बजावत असून, हेच भारतीय लोकशाहीचे यश आहे. कारण, सर्वसामान्य भारतीय नागरिक हा देशाचा केंद्रबिंदू असून, त्याच्यासाठीच हा सर्व प्रपंच चालला आहे. म्हणून तर भारतीय संविधानकारांनी भारतीय राज्यघटनेत अनुच्छेद क्रमांक 38अन्वये लोककल्याणकारी राज्याची संकल्पना मांडून प्रगल्भ लोकशाहीचा पाया घातला.

आज भारतीय लोकशाही संक्रमण अवस्थेत असून, ती प्रत्येक भारतीयांच्या नसानसात रुजून अधिक वृद्धिंगत करून सक्षम करणे, हे आपले आद्य राष्ट्रीय कर्तव्य आहे. कारण, आज आपल्या लोकशाहीसमोर आव्हानांचा हिमालय 'आ'वासून उभा आहे. या आव्हानांचा धैर्याने सामना करणे, हेच प्रगत भारतीयांचे लक्षण आहे.

## जातीयता व धर्मसंस्थेचा प्रभाव

'कधीही जात नाही ती जात' असे उपहासाने म्हटले जाते. जात व राजकारण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. जातीच्या नावावर राजकारण चालते व राजकारणात जात हाच श्वासबिंदू म्हणून कार्य करतो. जातीसंस्था ही आपल्या लोकशाही समोरील मोठे आव्हान आहे की विस्ताराचे साधन? हा प्रश्न कायम अनुत्तरीत राहिला आहे. लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी संविधानकारांनी व्यक्तीचा जन्मसिद्ध दर्जा नाकारून सर्वांना समान प्रतिष्ठा देणारा दर्जा निर्धारित केला व राज्यघटनेत कलम 17 रूपाने सुवर्णकलम जन्मास आले. याच कलमाच्या आधारे विकृत राजकारण सध्या सुरू आहे. सद्यस्थितीत प्रत्येक समाज घटकास आपले सामाजिक राजकीय अस्तित्व टिकून ठेवण्यासाठी आरक्षणाचा आधार हवा आहे. महाराष्ट्रात मराठा, धनगर,राजस्थानात गुजर,हरियाणात जाट, तेलंगणाच्या कापू या समाजाची आरक्षणाची जनआंदोलने लोकशाहीच्यास्थैर्यास बाधा आणतात.

धर्म म्हणजेच आपले सामाजिक जीवन निश्चित करणारी महत्त्वाची सामाजिक संस्था. भारतीय संविधानाने आपणास धर्मस्वातंत्र्य बहाल केले आहे. याच धर्माच्या नावाने भारताच्या राजकारणाचा अग्निकुंड सदैव धगधगत राहतो. राममंदिर,बाबरीमस्जिदया

धार्मिक अस्मितांच्या भोवतीच राजकारण फिरत राहते. आज भारताचा तिरंगा, हिंदूंचा भगवा, ख्रिश्चन, जैनांचा यांचा पांढरा, मुसलमानांचा हिरवा तर बौद्ध दलितांचा निळा अशा धार्मिक रंगात विभागला गेला आहे. कधीतरी सर्व जाती-धर्माचे रंग बाजूला सारून एकाच रंगात रंगावे व भारतीय म्हणून एकत्र येऊन एकच विचार करावा, हा दिवस जेव्हा येईल तेव्हा तो खऱ्या अर्थाने सुवर्णदिन ठरेल.

**राजकीय उदासीनता व घराणेशाही**

राजकारण म्हणजेच समाजातील दीन-दलित, अंध-अपंग, दुर्बल घटकांच्या विकासाचे पवित्र व्रत आहे आणि हेच आपल्या लोकशाहीचे प्रमुख उद्दिष्ट आहे. असे म्हणतात की, भारत हा तरूण रक्ताचा कार्यक्षम देश आहे. जगातील सर्वाधिक तरुण तुर्क भारतात आहेत. मात्र वयाने तरुण असलेल्या आपल्या देशात तरुणाई अपवादानेच राजकारणात आढळते. याचे प्रमुख कारण म्हणजे भारतीय राजकारणातील घराणेशाही. यामुळे तळागाळातील सर्वसामान्य कार्यकर्ता हा शेवटपर्यंत कार्यकर्ताच राहतो. प्रस्थापित नेत्यांची मुले, सुना, मुलगी, पत्नी, भाचा, पुतण्या अधिकारपदावर रूढ होऊन राजकीय संस्थानिकांचा जन्म होतो. महाराष्ट्रात अशीच अनेक राजकीय संस्थाने प्रत्येक जिल्ह्यात आढळतात. त्यामुळेच तरुण कार्यकर्ता राजकारणाकडे पाठ फिरवितो. तथापि एका ग्रामपंचायतीपासून ते संसदेपर्यंत आपणास प्रस्थापित नजरेस येतात.

मतदानाबद्दल आपणात आढळणारी उदासीनता आपणास अंतर्मुख करते. मतदान आपला पवित्र हक्क असून, आपले एक मत देशाचे भवितव्य ठरते, असे प्रबोधन प्रशासनाला करावे लागते. एवढा प्रपंच करून देखील मतदानाची टक्केवारी अपवादानेच ५०टक्के पर्यंत पोहोचते मग ते अपयश कोणाचे ? हा प्रश्न आपणास अंतर्मुख होण्यास भाग पडतो. आपल्यासारख्या सुजाण नागरिकांची मतदानाप्रती असणारी उदासीनता लोकशाहीच्या मुळावर उठली आहे.

**महिला सशक्तिकरण**

स्त्री-पुरुष ही संसाराची दोन चाके. यातील एक चाक जरी निकामी झाले तरी संसाराचा समतोल ढासळतो. मग राजकारणाचे क्षेत्र यास अपवाद कसे राहील? देशाच्या संसदेत महिलांना 33 टक्के प्रतिनिधित्व देण्याचे विधेयक कित्येक प्रत प्रलंबित आहे. कारण, राजकारणात आम्ही महिलांना समान संधी देऊ, हीचआरोळी ऐकून आम्ही लहानाचे मोठे झालो. पंचायत राज व्यवस्थेत महिलांना ५०टक्के आरक्षणाचा कायदा महाराष्ट्रासह अकरा घटक राज्यांनी केला. याचा त्यांच्या राजकीय जाणिवेत किती बदल झाला, हा प्रश्न अनुत्तरित राहिला आहे.१७व्या लोकसभेत ७८महिला संसद सदस्य बनल्या. महाराष्ट्रातून केवळ आठ महिला संसदेत कार्य करण्यास पात्र ठरल्या. जागतिक राजकारणाचा विचार केल्यास हे खूप नगण्य प्रमाण आहे. कारण अत्यंत हलाखीत असणाऱ्या रवांडा देशाचा संसदेत ६१टक्के महिला सदस्य म्हणून काम करतात. नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत केवळ २२ महिला निवडून आल्या. जर राज्यघटनेने प्रदान

केलेले स्त्री-पुरुष समानतेचे तत्त्व साकार करायचे असल्यास राजकारणात देखील आपणास लिंग समानतेचे तत्व अंगीकारायला हवे, तरच आपली लोकशाही सुदृढ होईल.

**राजकारणाचे गुन्हेगारीकरण**

लोकशाही म्हणजे कायद्याचे राज्य व कायदेमंडळ म्हणजे देशाचे कायदे करणारे सर्वोच्च कायदे मंदिर. पण, या पवित्र मंदिरात पाठीशी हजारो गुन्ह्यांची जंत्री असणाऱ्या व्यक्तीच जेव्हा कायदे तयार करतात ? यासारखी लोकशाहीची क्रूर थट्टा जगात अन्यत्र कोठेही झाली नसेल. राजकारणाचे गुन्हेगारीकरण व गुन्हेगारांचे राजकारण आपल्यासारख्या सुजाण नागरिकास अस्वस्थ करते.

**केंद्रपुरस्कृत दाबावयचे राजकारण**

भारतीय शासनपद्धती ही संघराज्य संसदीय स्वरूपाची असून, घटक राज्य व केंद्रशासित प्रदेशाचे अंतिम प्रशासन चालवण्याचा अधिकार केंद्रास आहे. आपल्या व्यापक अधिकारातून केंद्र कलम १५३अन्वये राज्यपाल घटनात्मक पदाची आपल्या शिफारशीने राष्ट्रपतीद्वारे नियुक्ती करून घटक राज्यावर अंतरिम अंकुश ठेवतात. राज्यपाल हे आपले घटनात्मक कर्तव्य पार पाडताना त्यांच्यावरील केंद्राचा दबाव अधोरेखित होतो. केंद्रात ज्या विचारांचे शासन घटक राज्यात देखील त्याच विचारांचे शासन असावे हा अट्टाहास राज्यपालांकडून पूर्ण करून घेतला जातो. यासाठीचे**सत्तम** उदाहरण आपल्या महाराष्ट्राचे देता येईल. मध्यरात्री राष्ट्रपती राजवट हटून भल्या पहाटे मुख्यमंत्रीपदाची दिलेली शपथ ही लोकशाहीला काळीमा फासणारी घटना आहे, वयात राज्यपालांची घटनाबाह्य भूमिका आपणास ठळकपणे जाणवते. ही बाब एक सजग नागरिक म्हणून आपणास अस्वस्थ करते.

**विरोधी पक्षाचे निर्दालन**

राजकीय व्यवस्थेत सत्ताधारी पक्षाबरोबरच विरोधी पक्षाचे स्थान हे अनन्यसाधारण स्वरूपाचे आहे. सत्ताधारी पक्षाच्या अनिर्बंध सत्तेवर अंकुश ठेवण्यासाठी विरोधी पक्षाचे महत्व संविधानकारांनी सुद्धा स्पष्ट केले आहे. मात्र, सध्याच्या राजकीय परिस्थितीत साम, दाम, दंड, भेद या चतु:सूत्रीच्या वापराने विरोधी पक्षाचे निर्दालन करण्याचे काम सत्ता पक्षाने चालवली असून, अनेक घटनात्मक संस्थांचा दुरुपयोग करून विरोधी पक्षाचा आवाज दडपण्याचे काम सर्रास होत आहे. हे असेच सुरू राहिल्यास प्रगल्भ भारतीय लोकशाही अनिर्बंध हुकूमशाहीत कधी रुपांतरित होईल, हे समजणार देखील नाही. संपूर्ण देश 'कोरोना' विषाणूच्या विरोधात झगडत असताना भारताच्या मध्यभागी असणाऱ्या मोठ्या राज्यात केंद्रातील सत्तेचा दुरुपयोग करून तत्कालीन सत्ता पक्षातील असंतुष्ट नेत्यांना फोडून आपले शासन बनवण्याचा लाजिरवाणा प्रकार उभ्या देशाने 'याची देही याची डोळा' पाहिला आहे. असे प्रकार करून आपण जनादेशाचा अवमान करून लोकशाहीची हत्याच करीत आहोत.

**मतदाराला ग्राहक बनविण्याचा प्रयत्न:** लोकशाही व्यवस्थेत अंतिम सत्ता ही जनादेशावर अवलंबून असते. या प्रक्रियेत मतदार हा केंद्रबिंदू असतो. सद्यस्थितीत या मतदारराजाला

विविध प्रलोभने दाखवून त्यांच्या पवित्र मतांची अक्षरशा बोली लावली जाते व मतदान हा आपला ग्राहकच आहे, या उन्मादाने सर्वच राजकीय पक्ष वागत आहेत. म्हणजेच सर्वसामान्य मतदारांना गृहीत धरण्याचे काम हे लोकशाही सशक्तीकरणासाठी अत्यंत घातक आहे.'मतदारराजा जागा हो लोकशाहीचा धागा हो' ही फक्त घोषणाच होत आहे.

**राजकीय पक्षाचे अनिर्बंध स्वातंत्र्य**

लोकशाही व्यवस्थेत पारदर्शकता आणून अधिक लोकभिमुख करण्यासाठी 2005 मध्ये प्रदीर्घ संघर्षानंतर माहितीचा अधिकार कायदा देशभर लागू झाला. देशाचे पंतप्रधान, केंद्रीय मंत्री, घटक राज्याचे मुख्यमंत्री व त्यांचे मंत्रिमंडळ तसेच सनदी अधिकारी आपल्या उत्पन्नाचे साधन लोकांसाठी जाहीर करतात. मात्र, सर्वसंमतीने या कायद्यातून देशातील राजकीय पक्षांना अलगद बाजूला ठेवले आहे. त्यांना मिळणाऱ्या देणग्या, त्यांचा खर्च याची कुठेच नोंद केली जात नाही. म्हणजेच भारताची राजकीय पक्ष भ्रष्टाचाराचे कारखानेच बनले आहेत. याची कुणालाच कळत नाही. हेच खरे लोकशाहीचे दुर्दैव आहे.

आपली राजकीय उदासीनता, अल्प राजकीय सजगता जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीचा विनाशास कारणीभूत ठरत आहे. लोकशाही आहे म्हणून मी आहे,आपण आहोत. ही जबाबदारीची भावना प्रत्येक भारतीयात रुजून ही सर्वात मोठी लोकशाही अधिक प्रगल्भ करणे, हे माझे नैतिक कर्तव्य आहे. हीच भावना प्रत्येकात रुजायला हवी, तरच या प्रगल्भ लोकशाहीचे नौका पैलतीर पार करू शकेल, अन्यथा या लोकशाहीचा मूलाधार सर्वसामान्य माणूस आहे. तो कायम उपेक्षितच राहिली व भारतीय लोकशाही केवळ इतिहासाचे एक पान बनेल आता सर्वस्वी निर्णय आपल्या हाती आहे. ही प्रगल्भ लोकशाही ताराची की मारायची ?

**संदर्भ :**

1)इंडियन लिटी लक्ष्मिकांत, श्रीकांत गोखले (मराठी अनुवाद) के.सागर प्रकाशन, पुणे २०१७.

2)भारताचे शासन व राजकारण, भा.ल.भोळे पिंपळपुरे प्रकाशन, नागपुर २०१४

3)दै.लोकसत्ता, दै.लोकमत, दै.महाराष्ट्र टाइम्स, दै.तरुण भारत.

4)बीबीसी मराठी, वार्ता, वाहिनी.

5) यशाची परिक्रमा, पृथ्वी पब्लिकेशन, पुणे.